जा.क्र.         /२०२०
जिल्हा न्यायालय अकोला
दिनांक   मार्च, २०२०.

प्रति,

-------------------------
-------------------------
-------------------------
-------------------------

<u>विषय</u>: पोक्सो कायद्याअंतर्गत दाखल प्रकरणांचा निपटारा करण्याकरीता विशेष पोक्सो / जलद गती न्यायालयामध्ये नियुक्ती करणेबाबत.

<u>संदर्भ</u>: १.मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र दिनांक २० मार्च, २०२०.
२.विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.जगन्या १४१९/५/ प्र.क्र.४/का-नउ दि.०४ मार्च, २०२०.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, उक्त नमुद संदर्भांकित पत्र व शासन निर्णयानुसार अकोला मुख्यालयी पोक्सो कायद्याअंतर्गत दाखल प्रकरणांचा निपटारा करण्याकरीता एक विशेष पोक्सो आणि दोन जलद गती न्यायालये तसेच अकोट येथे एक जलद गती न्यायालय एक वर्षाच्या कालावधीकरीता स्थापन करण्यास मंजूरात दिलेली आहे.

त्याअनुषंगाने अकोला न्यायीक जिल्हयातुन सन २०१६ पासुन नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या खालील संवर्गातील पदधारकांची सदरहू न्यायालयांमध्ये करार तत्वावर नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | संवर्ग | करार तत्वावर नियुक्त करावयाची पदे |
|---|---|---|
| १ | लघुलेखक उच्च श्रेणी | ४ |
| २ | अधिक्षक | ४ |
| ३ | वरिष्ठ लिपीक | ४ |
| ४ | कनिष्ठ लिपीक | ८ |
| ५ | शिपाई | ८ |

उक्त पदधारकाचे मासिक परिश्रमीक व भत्ते हे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७.१२.२०१६ नुसार प्रदान करण्यात येतील.

सबब आपणांस सुचित करण्यात येते की, आपण उक्त नमुद न्यायालयामध्ये सेवानिवृत्ती नंतर करार तत्वावर कर्तव्य पार पाडण्यास इच्छुक असल्यास त्याबाबतची लेखी संमती दि.३०.०३.२०२० रोजी अथवा तत्पुर्वी या कार्यालयास सादर करावी.

माहिती व कार्यवाहीस्तव

आदेशान्वये,

(अ.स.लव्हाळे)
प्रबंधक
जिल्हा न्यायालय अकोला.

23.03.2020